## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-६०९/२०२१

**अपिलार्थी, श्री. रविंद्र कुमार दुबे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्र. सहा. आयुक्त,**
प्रभाग समिती जी वालिव, वसई विरार शहर महानगरपालिका, वालीव नाका, वसई (पू),
ता.वसई, जि.पालघर ४०१ ३०५

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, (मुख्यालय)**
वसई विरार शहर महानगरपालिका, वालीव नाका,
वसई (पू), ता.वसई, जि.पालघर ४०१ ३०५

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३.६.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.१०.२०२० | ---- | १.१२.२०२० | ---- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.१७.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३.६.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त बाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२०.५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये आयोगास खालीलप्रमाणे लेखी निवेदन दिलेले आहे.

"एतद् द्वारा विनम्र निवेदन किया जाता है की अपिलकर्ता यानी रविंद्रकुमार दुबे अत्यावश्यक कार्यवश अपने गृहदेश गांव मडइया (भुभुवार) पोस्ट-साहोपट्टी, जि. जौनपूर (उ.प्र) मे. दि.२४.४.२०२२ को ही आ गया है तथा १० जून २०२२ तक यहां का कार्य पूरा कर, नालासोपारा जि. पालघर के अपने उक्त कार्यालय पर पहुंचेगा.

अत एवं महोदय जी से विनम्र निवेदन है की उपरोक्त द्वितीय अपीलों की तारीख दि.३.६.२०२२ से आगे बढाकर जून-२०२२ की कोई भी अन्य तारीख सुनावणी के लिये प्रदान किये जाने की कृपा करे. अपीलकर्ता की अनुपस्थिती में महोदय जी का निर्णय अपिलकर्ता को मान्य होगा."

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, अपिलार्थी यांनी वेळेची मागणी केली आहे. त्यांची मागणी करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी नंतर सुनावणी घेण्यात येईल व सुनावणीची वेळ स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी नंतर सुनावणी घेण्यात येईल व सुनावणीची वेळ स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.**

सुनील पोरवाल
(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जून, २०२२

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

संगणक-१०